MHLA050005272016

नियमीत दिवाणी दावा क्र.५४/२०१६
भागिरथीबाई वि. मंचक

## नि.क्र. ५२ खालील आदेश

०१. प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ अन्वये वादीने दाखल केला आहे. त्यांच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.२ जयवंत नागरगोजे यांना सामील पक्षकार केले आहे. त्याच्याविरुध्द दाद मागण्यासाठी वादपत्रात मजकुर असणे आवश्यक आहे. तो मजकुर अर्जात नमूद करुन अर्ज मंजूर होण्याची विनंती वादीने केली. नि.क्र.५३ लगत अर्जाच्या सहायार्थ वादीचे शपथपत्र देण्यात आले.

०२. प्रतिवादीने दिलेल्या म्हणण्यानूसार अर्ज खोटया मजकुराचा आहे. त्यातील कारणे चुकीचे आहेत. त्यामुळे, अर्ज रद्द व्हावा.

०३. प्रतिवादी क्र.२ ने म्हणणे देवून अर्ज मंजूर केल्यास कैफीयत देण्याची संधी असावी असे नमूद केले.

०४. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

०५. दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ अन्वये वादी किंवा प्रतिवादी दाव्याच्या कोणत्याही घडीला आपली कथने दुरुस्त करण्याकरीता अर्ज देवू शकतात व न्यायालय आपल्या मर्जीत अर्ज मंजूर करु शकते. परंतुकानुसार, दाव्याची सुनावणी सुरु झाली असल्यास अशा स्वरुपाचा अर्ज मंजूर करु नये.

०६. याकामी, सदरचा दावा विशिष्ट अनुतोष मागण्यासाठी असून खरेदीपत्र उलटून करुन द्यावे म्हणून आहे. प्रतिवादीने मिळकती जयवंत नागरगोजे याला विकल्या आहेत. त्यामुळे, दावा सुरु असताना अशी मिळकत विकली गेल्याने नवीन खरेदीदार मुळ प्रतिवादीच्या जागी येणे आवश्यक आहे. त्याच्याविरुध्द मजकुर नमूद करणे ही आवश्यक आहे. म्हणून, दुरुस्तीने प्रतिवादी क्र.२ विरुध्द मजकुर नमूद करण्यासाठी हा अर्ज आहे.

०७. दाव्याची सुनावणी जरी सुरु झाली असली तरी अद्यापी वादीतर्फे शपथपत्र दाखल केले गेले नाही. मा.उच्च न्यायालयातून दि.२०/०७/२०१७ रोजी रिट याचिका

क्र.९२५१/२०१७ मधील अंतीम आदेशाप्रमाणे तहकुबी आदेश संपुष्टात आला आहे. सदरच्या घडामोडी त्यानंतरच्या आहेत.

**०८.** याकामी, दावा सन २०१६ सालातील आहे. प्रतिवादी क्र.२ याकामी हजर होवून त्यांनी नि.क्र.३६ वरील अर्जास आपले म्हणणे यापुर्वीच दाखल करुन युक्तीवाद केला आहे. त्यामुळे, त्यांना या दाव्यातील कागदपत्रांची माहिती आहे. दावा जूना असल्यामुळे तो लवकरात लवकर निकाली होण्यासाठी कोणत्याही प्रकारे वेळ दवडता कामा नये, यासाठी काही आदेश वादी, प्रतिवादींनी त्याप्रमाणे वागण्यासाठी करणे गरजेचे व भाग आहे. त्यामुळे, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

**१.** अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२.** वादीने तातडीने आजच्या आज दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त दावा प्रत व प्रतिवादी यांना देण्यासाठी अतिरीक्त प्रती न्यायालयात आजच्या आज दाखल कराव्या. तसेच, प्रतिवादी क्र.२ यांना देण्यासाठी दाव्यातील कागदपत्रांची एक प्रत आजच न्यायालयात दाखल करावी.

**३.** दाव्याची प्रत न्यायालयात दाखल झाल्यानंतर लगेचच प्रतिवादी क्र.२ याने ती स्वीकारावी आणि आपली कैफीयत, दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ८ नियम १ मध्ये काहीही नमूद असले तरी पुढील ०८ दिवसातच द्यावी.

स्वाक्षरीत/-

**दिनांक २१/०७/२०२५.**

**[एस.एन.सरडे]**
**दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहदमपूर.**